| MHSO200011982023 | **फौजदारी किरकोळ अर्ज क्र. २९४/२०२३** |
| --- | --- |

## निशाणी क्र. ०५ वरील आदेश

प्रस्तुत अर्जाद्वारे अर्जदार हिने कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ (यापुढे अधिनियम असा संक्षिप्त उल्लेख करण्यात येत आहे) चे कलम २३ अन्वये सामनेवाला क्र. १ कडून अंतरिम पोटगीची मागणी केली आहे.

२. अर्जदार हीने उपरोक्त अधिनियमाचे कलम १२ अन्वये दाखल केलेल्या मूळ अर्जामध्ये तिने विविध प्रकारच्या मागण्या केल्या असून सद्यस्थितीत तो अर्ज पुराव्याकरीता प्रलंबित आहे. सदर अर्जामध्ये तिचे थोडक्यात कथन असे आहे की, तिचे सामनेवाला क्र. १ याच्याशी दि. ०४/०८/२०२२ रोजी हिंदु धर्मानुसार लग्न झाले असून सदर लग्नाचा संपूर्ण खर्च अर्जदाराचे वडीलांनी केला असून सर्व संसार उपयोगी साहित्य तसेच एक तोळे सोन्याचे लॉकेट, अडीच तोळ्याचे सोन्याचे नेकलेस, तीन तोळ्याचे सोन्याचे गंठण, चांदीचे पैंजण व जोडवी देऊन लग्न करुन दिले आहे. लग्नानंतर अर्जदार ही सामनेवालाकडे नांदण्यास गेली तेव्हा सर्व सामनेवाला यांनी अर्जदार हिस लग्नात योग्य तो मानपान झाला नाही, लग्नात हुंडा दिला नाही म्हणून शारीरीक व मानसिक त्रास देणे चालु केले. अर्जदार हिस अपमानास्पद बोलणे, शिवीगाळ करणे, उपशी ठेवणे, औषधोपचार न करणे अशा प्रकारे शारीरीक व मानसिक छळ करु लागले. सदरच्या बाबी अर्जदार हिने तिच्या नातेवाईक व आईवडीलांनी सांगितली असता ते अर्जदार हिस समजावून सांगून सामनेवाला यांचेत आज ना उद्या फरक पडेल अशी आशा देत होते. त्यानंतर सामनेवाला क्र. १ यांनी फळाच्या व्यापाराकरीता अर्जदार हिच्या माहेरुन पाच लाख रुपयांची मागणी केली. त्यावेळी अर्जदार हिने लग्नाच्या वेळी खर्च जास्त झाल्याने व खाजगी कर्ज असल्याने माहेरुन पैसे आणण्यास नकार दिला. त्यामूळे, दि. १६/०३/२०२३ रोजी सामनेवाला यांनी अर्जदार हिस शारीरीक व मानसिक छळ करुन तिचा त्याग केला व तिला घराबाहेर हाकलून दिले. तेव्हापासून अर्जदार ही तिच्या

आईवडीलांकडे राहत आहे.

३. अर्जदार हिचे पुढे असे कथन आहे की, सामनेवाला क्र. १ हा अर्जदाराचा त्याग केल्यापासून तिचे संगोपन व पालनपोषण करण्याची जबाबदारी टाळत आहे. यातील अर्जदार हिस उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. यातील सामनेवाला क्र. १ ते ४ यांचा सलुनचा व्यवसाय असून ते प्रत्येकी दरमहा रु. ३०,०००/- मिळवतात तसेच सामनेवाला क्र. १ हा फळांचा व्यापार करुन त्यास दरमहा रु. ५०,०००/- मिळतात. अशा प्रकारे सामनेवाला क्र. १ यास दरमहा रु. ८०,०००/- उत्पन्न आहे. यातील अर्जदार हिस पोटगी व अंतरीम पोटगी देण्याची सामनेवालांची ऐपत आहे. त्यामूळे सामनेवाला यांनी अर्जदार हिचा कौटुंबिक हिंसाचार करु नये, अर्जदार हिच्या निवासाची सोय करावी किंवा घरभाडे म्हणून दरमहा रु. ५,०००/-, दरमहा रु. ३०,०००/- पोटगी द्यावी. तसेच रक्कम रुपये २०,००,०००/- नुकसानभरपाई द्यावी व अर्जदार हिच्या लग्नाच्या वेळी व लग्नानंतर दिलेले सर्व दागदागिने, स्त्रीधन, कपडेलत्ते, भांडी, कपाट, बेड, संसारसेट हे सामनेवाला क्र. १ कडून अर्जदार हिच्या ताब्यात मिळावे अशी तिने मूळ अर्जात विनंती केली आहे.

४. प्रस्तुत अर्जाद्वारे अर्जदार हिने मूळ अर्जाचा गुणवत्तेवर निर्णय होण्यास कालावधी होणार असे नमूद करुन अर्जदार हिस दरमहा रु. ३०,०००/- प्रमाणे अंतरीम पोटगी मंजूर व्हावी तसेच अर्जदार हिच्या लग्नाच्या वेळी व लग्नानंतर दिलेले सर्व दागदागिने, स्त्रीधन, कपडेलत्ते, भांडी, कपाट, बेड, संसारसेट हे सामनेवाला क्र. १ कडून अर्जदार हिच्या ताब्यात मिळावे अशी विनंती केली आहे.

५. सामनेवाला क्र. १ ने प्रस्तुत अर्जास म्हणणे नि.क्र. १९ वर दाखल केले असून अर्जदाराशी असलेले नातेसंबंध मान्य केले आहेत. मात्र, अर्जदाराने त्यांचे विरुध्द केलेले आरोप स्पष्टपणे नाकारले आहेत. त्याच्या म्हणण्यानुसार, सदर लग्नाचा संपूर्ण खर्च हा सामनेवाला यांनी केलेला आहे. तसेच, अर्जदार हिस तिचे आईवडीलांनी कोणत्याही प्रकारचे सोन्याचे दागिने दिलेले नाही. अर्जदार हिच्या वडीलांची आर्थिक परीस्थीती चांगली आहे परंतु, सध्या विवाहासाठी मुली मिळणे अशक्य असल्यामूळे व अर्जदाराचे आईवडील हे अतिशय धोरणीक असल्याने त्यांनी विवाहात अर्जदार हिस कोणत्याही

प्रकारचे सोन्याचे दागिने घातलेले नाही. लग्नानंतर अर्जदार ही सांसारीक कामात मदत न करता गप्प गप्प बसत असे व सामनेवाला क्र. २ ते ५ यांच्याशी बोलण्याचे टाळून एकटीच टीव्ही बघत बसत असे. तसेच, अर्जदार ही सकाळी व संध्याकाळी गोळया खात असल्याचे सामनेवाला क्र. १ याच्या निदर्शनास आल्यानंतर त्याने त्याबाबत विचारणा केली असता अर्जदार हिने तिला बालदमा असल्याचे सांगितले. त्यावेळी सामनेवाला क्र. १ याने गावातील व इस्लामपूर येथील वेगवेगळया दवाखान्यांमध्ये तिच्यावर औषधोपचार केला होता. त्यानंतर डॉक्टरांच्या सल्ल्याप्रमाणे इस्लामपूर येथील मानसोपचार तज्ञ डॉ. मोरे यांच्या हॉस्पीटलमध्ये अर्जदारावर उपचार घेतलेला होता. परंतु, अर्जदार हिच्या वागण्यात कोणताही बदल झाला नाही. नोव्हेबर २०२२ मध्ये दुसऱ्या आठवड्यात अर्जदार हिने सामनेवाला क्र. २ ते ५ यांच्याशी विनाकारण भांडण काढून त्यांना शिवीगाळ केली. सामनेवाला क्र. १ याने त्याबाबत अर्जदार हिस विचारले असता तिने आपण स्वतंत्र राहु असे सांगितले. अर्जदाराचे आईवडीलांनी देखील सामनेवाला क्र. १ यास स्वतंत्र राहण्यास सांगून धमकी दिली. अर्जदार हिने स्वतंत्र राहण्याच्या हट्टापोटी गळफास लावून घेण्याचा देखील प्रयत्न केलेला आहे.

**६.** सामनेवाला क्र. १ याचे पुढे असे कथन आहे की, त्याच्या घरी केवळ सामनेवाला क्र. ४ हेच एकटे मिळवते व्यक्ती आहेत. सामनेवाला क्र. २ व ३ हे वयोमानानुसार नेहमी आजारी असल्यामूळे त्यांच्या औषधपाण्याचा खर्च, सामनेवाला क्र. ४ यांच्या दोन मुलांचा शिक्षण व औषधपाण्याचा खर्च हे सामनेवाला क्र. ४ हेच करतात. सामनेवाला क्र. १ हे द्राक्षबागेत मजूरीस जात असल्यामूळे त्यांना त्यातून दरमहा रु. ५ ते ६ हजार इतकीच रोजंदारी मिळते. त्यातूनच सामनेवाला क्र. १ यांनी लग्नासाठी घेतलेल्या कर्जाचे मासीक हप्ता रु. ६८३६/– त्यांना द्यावा लागतो. अशा प्रकारे सामनेवाला यांचे कुटूंब हे आर्थिकदृष्टया दुर्बल आहे. याउलट, अर्जदार हिच्या आईवडीलांची आर्थिक परीस्थीती चांगली असून त्यांच्या मौजे शिवणी, ता. सांगोला येथे स्थावर व जंगम मालमत्ता आहेत.

**७.** सामनेवाला क्र. १ याचे पुढे असे कथन आहे की, अर्जदार हिच्या हट्टापोटी सामनेवाला क्र. १ हे इस्लामपूर येथे भाडयाने खोली घेऊन व इस्लामपूर येथील फल्ले यांच्या द्राक्षबागेत मजुरी करुन अर्जदार सोबत स्वतंत्र राहत होते. परंतु, त्यानंतरदेखील

अर्जदार व सामनेवाला क्र. १ यांच्यामध्ये किरकोळ कारणावरुन वादविवाद, भांडणतंटे होऊ लागले. इस्लामपूर येथे राहण्यास आल्यानंतर अर्जदार हिने सामनेवाला क्र. १ यास कधीही मानसिक व शारीरीकसुख दिलेले नाही. अर्जदार ही चैनीखोर स्वभावाची असल्याने ती तिच्या मर्जीप्रमाणे बाहेर जाऊन खरेदी करत होती त्यामूळे सामनेवाला क्र. १ याने त्याच्या नातेवाईकांकडून दोन ते अडीच महिन्यात पन्नास हजार इतकी रक्कम हातऊसनी घेतलेली होती. सध्या सामनेवाला क्र. १ यास उत्पन्नाचे कोणतेही साधन नसून त्याच्यावर सध्या कर्जाऊ अडीच ते तीन लाख इतके देणे आहे. त्यानंतर सामनेवाला क्र. १ याने अर्जदार हिस काही तरी कामकाज करण्याबाबत विनंती केली असता अर्जदार हिने सामनेवाला क्र. १ सोबत भांडण करुन त्याच्या परस्पर न सांगता निघून गेली आहे. अर्जदार व तिच्या आईवडीलांनी सामनेवाला क्र. १ याची फसवणूक करुन अर्जदार ही मनोरुग्ण असताना देखील तिचा विवाह त्याच्याशी लावून दिलेला आहे. अर्जदार हिने सामनेवाला क्र. १ यांना कौटुंबिक सुखापासून वंचीत ठेवलेले आहे. अर्जदार ही स्वतःहून माहेरी राहत असल्याने तिला पोटगी मागण्याचा कोणताही अधिकार नाही. सबब, प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करावा अशी त्याची विनंती आहे.

८. तसेच, प्रकरण प्रलंबित असताना अर्जदार व सामनेवाला क्र. १ यांनी त्यांची मालमत्ता व दायित्व बाबतची शपथपत्रे दाखल केली आहेत. सामनेवाला यांना वारंवार संधी देऊनदेखील त्यांनी तोंडी युक्तीवाद किंवा लेखी युक्तीवाद सादर केलेला नाही.

९. अर्जदार हिने नि.क्र. १४ वर लेखी युक्तीवाद सादर केला. उभय पक्षांनी दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले. उभयपक्षांच्या कथनावरुन उपस्थित झालेली बाब व त्यावरील माझा निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नमूद करीत आहे –

| **अ.क्र.** | **विचारार्थ बाबी** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | अर्जदार अंतरिम पोटगीचा आदेश मिळण्यास पात्र आहे काय ? असल्यास किती ? | होय. अर्जदार हिस दरमहा रु. २५००/– प्रमाणे |
| २ | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

**विचारार्थ बाब क्र. १ व २ करीता –**

**१०.** एकमेकाशी असलेले नातेसंबंध उभय पक्षांना मान्य आहेत. या पार्श्वभूमीवर अर्जातील कथन पाहता अर्जदार हिच्या म्हणण्यानुसार सामनेवाला यांनी तिचा वेळोवेळी शारीरीक व मानसिक छळ केला आहे. तसेच, सामनेवाला क्र. १ याने पैशाची मागणी करुन अर्जदार हिस मारहाण, शिवीगाळ करुन तिला माहेरी हाकलून दिले आहे. अर्जदार ही सध्या माहेरी राहत असून माहेरची परीस्थीती गरीबीची आहे. तसेच, तिच्याकडे उत्पन्नाचे साधन नाही. सामनेवाल क्र. १ हा फळांच्या व्यापारातून तसेच सलुनच्या व्यवसायातून दरमहा रु. ८०,०००/– इतके उत्पन्न मिळवतो. त्यामूळे, तो तिला अंतरीम पोटगी देऊ शकतो.

**११.** सामनेवाला यांच्या कथनानुसार अर्जदार ही सासरी कधीही व्यवस्थीत नांदलेली नाही. ती नेहमी गप्प राहत असे, स्वतंत्र राहण्याची मागणी करत असे. सामनेवाला क्र. १ हा स्वतंत्र राहुनसुध्दा तिच्या वागण्यामध्ये फरक पडला नसून ती स्वतःहून माहेरी निघून गेली आहे. तसेच, अर्जदार हिचे आईवडील अर्जदार हिच्या विचीत्र वागण्यास खतपाणी घालत असत. सामनेवाला यांनी तिला समजावून सांगण्याचा प्रयत्न केला असता परंतु अर्जदार हिने स्वतंत्रपणे राहण्याचा हट्ट धरला व सामनेवाला यांचे काहीही एकले नाही. सामनेवाला क्र. १ हा द्राक्ष बागेत मजुरीस जात असल्याने त्यास मजुरी करुन दरमहा पाच ते सहा हजार रुपये इतकी रोजंदारी मिळते. तसेच सामनेवाला यांनी अर्जदार ही मनोरुग्ण असतानादेखील तिचा विवाह तिच्या आईवडीलांनी सामनेवाला क्र. १ याच्याशी लाऊन दिला असे कथन केलेले आहे. त्यामूळे, अर्जदार हिचा अंतरीम अर्ज खर्चासह फेटाळण्यात यावा अशी त्यांनी विनंती केली आहे.

**१२.** उभय पक्षांचे कथन विचारात घेता त्यांनी एकमेकांविरुध्द गंभीर स्वरुपाचे आरोप केल्याचे दिसून येते. त्यामूळे, उभय पक्षांना त्यांचे म्हणणे पुराव्यानिशी सिध्द करण्यास संधी देणे आवश्यक दिसून येते. अर्जदार व सामनेवाला यांच्यामधील नातेसंबंध उभय पक्षांनी मान्य केले आहे. अर्जदाराने तिच्या अर्जात सामनेवाला यांनी तिचा कौटुंबिक हिंसाचार केल्याचे कथन केलेले आहे. तसेच, सामनेवाला क्र. १ याने अर्जदार

हिचा त्याग केला असून अर्जदारास तो सांभाळत नसून तिचे पालनपोषण करत नसल्याचे कथन केले आहे. तसेच, अर्जदार हिच्या कथनाप्रमाणे सामनेवाला क्र. १ याने फळाच्या व्यापाराकरीता भांडवल कमी पडल्याचे सांगून अर्जदार हिच्याकडे रक्कम रु. पाच लाख आणण्याचा तगादा लावला आहे. तसेच, तिला घराबाहेर हाकलून दिले व तिचा त्याग केला. तेव्हापासून अर्जदार ही तिच्या आईवडीलांकडे राहत आहे. तिच्याकडे उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. याउलट सामनेवालांची आर्थिक परीस्थीती चांगली आहे. अर्जदारास सामनेवाला क्र. १ सोबत नांदायची ईच्छा असून त्याअनुषंगाने तिने पंढरपूर येथील मा. दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर येथे वैवाहीक हक्क पुर्नस्थापीत करण्यासाठी दाखल केलेल्या प्रकरणाच्या निकालाची प्रत नि.क्र. २८ सोबत दाखल केलेली आहे. सामनेवाला याचे सलून व्यवसाय असून त्यांना प्रत्येकी दरमहा तीस हजार रुपये उत्पन्न मिळत असून सामनेवाला क्र. १ हा फळाचा व्यापार करीत असल्याने त्यास दरमहा पन्नास हजार रुपये उत्पन्न प्राप्त होते. अर्जदार हिने नि.क्र. २९ सोबत पुरसीस दाखल करुन नि.क्र. ५ मधील फक्त अंतरीम मासिक पोटगीची विनंती विचारात घेण्यासंदर्भात विनंती केलेली आहे.

**१३.** याउलट, सामनेवाला यांचे असे कथन आहे की, अर्जदार यांना स्वतंत्रपणे वेगळे राहायचे होते तसेच ती विवाहानंतर सामनेवाला यांच्या घरात कुणाशी न बोलता गप्प बसून राहत असे. तिला बालदमा होता तसेच तिच्यावर मानसोपचार तज्ञ यांच्याकडून उपचार घेण्यात आलेले आहेत. परंतु अर्जदार हिच्या वागण्यात कोणताही फरक आलेला नाही. उलट ती स्वतंत्रपणे राहण्याबाबत नेहमी तगादा लावत होती. अर्जदार द्राक्ष बागेत मजुरीस जात होती व तिला रोज रु. दोनशे ते तिनशे इतका पगार मिळत होता. सामनेवाला याच्यावर रु. दोन लाखाचे कर्ज असून त्याचा मासिक हप्ता रु. ६८२६/- इतका द्यावा लागतो. तसेच, सामनेवाला याच्याकडे मासिक पाच ते सहा हजार रुपयांचे उत्पन्न आहे. याउलट अर्जदार हिचे आईवडीलांकडे वडीलार्जित शेतमिळकत असून त्यांच्याकडे स्थावर व जंगम मालमत्ता आहे. तसेच त्यांचे पुढे असे कथन आहे की, सामनेवाला क्र. १ यांच्यावर सध्या अडीच ते तीन लाख रुपयांचे देणे आहे व ते अर्जदार यांच्या वागण्यामुळे पुर्णपणे मानसिक व आर्थिकरीत्या खचलेले आहेत.

**१४.** प्रस्तुत प्रकरणात अर्जदार तसेच सामनेवाला क्र. १ याने त्यांच्या मालमत्ता व

दायित्व बाबतचे प्रतिज्ञापत्रांव्यतीरीक्त इतर कोणताही प्रथमदर्शनी पुरावा अभिलेखावर सादर केलेला नाही. सामनेवालाचे अर्जदार ही मनोरुग्ण असल्याचे तसेच त्याची फसवणूक केल्याचे प्रतिकथन हे अभिलेखावर संयुक्तीक पुराव्याअभावी शाबित होणार नाही. तसेच, अर्जदार ही सामनेवालापासून विभक्त राहत असल्याची बाब अभिलेखावरुन प्रथमदर्शनी स्पष्ट होते. तसेच, अर्जदाराच्या पालनपोषणाकरीता सामनेवाला क्र. १ आर्थिक तरतुद केल्याचे सामनेवाला क्र. १ चे प्रतिकथन नाही. तसेच त्याबाबत कोणताही पुरावा अभिलेखावर दिलेला नाही. अर्जदार व सामेनवाला क्र. १ यांच्यातील वैवाहीक संबंध आजही कायम आहेत. पती या नात्याने सामनेवाला क्र. १ याची अर्जदाराच्या पालनपोषणाची नैतिक जबाबदारी आहे. अर्जदार ही मासिक पाच हजार रुपये शिलाई व्यवसायातून कमवते असे सामनेवाला क्र. १ याचे कथन आहे परंतु, सदर बाब शाबित करण्यासाठी कोणताही प्रथमदर्शनी पुरावा सामनेवाला यांनी अभिलेखावर सादर केलेला नाही. या सर्व बाबींचा विचार करता प्रथमदर्शनी अर्जदार सामनेवाला क्र. १ कडून अंतरीम पोटगी मिळण्यास पात्र आहे हे स्पष्ट होते. सामेनवाला हा शेतामध्ये मजुरी करुन मासिक पाच ते सहा हजार अनियमीतपणे कमवत असल्याचे त्याचे कथन आहे. तसेच, त्याच्यावर अडीच ते तीन लाख रुपये कर्ज असल्याचे सामनेवाला क्र. १ चे कथन आहे व त्यापोटी त्यास महिना रु. ६८३६/– इतका हप्ता द्यावा लागतो असे कथन आहे. याउलट अर्जदाराच्या कथनानुसार सामनेवाला क्र. १ हा सलून व्यवसाय तसेच फळाचा व्यापार करतो असे कथन आहे. परंतु, अर्जदाराने सदर कथनाच्या पृष्टयार्थ अभिलेखावर काहीही दाखल केलेले नाही.

**१५.** सामनेवाला क्र. १ याच्या मासिक पगारामध्ये तसेच त्याला भरावयास लागत असलेल्या मासिक हप्त्याच्या रक्कमेमध्ये विरोधाभास जाणवतो. अशा परीस्थीतीत सामनेवाला क्र. १ याची शारीरीक पात्रता, वय लक्षात घेता तो शेती किंवा इतर व्यवसाय करण्यास सक्षम असल्याचे दिसून येते. सध्याच्या काळात मोलमजुरी करणाऱ्या इसमास दिवसाकाठी रु. चारशे ते सहाशे इतकी मजुरी मिळते. यावरुन त्याचे मासिक उत्पन्न रु. बारा हजार ते चोवीस हजार असे धरता येईल. अर्जदाराचा दैनंदीन खर्च, राहणीमान व सामनेवालाचे जबाबदाऱ्या व गृहीत धरलेले उत्पन्न विचारात घेता मूळ अर्जाचा निकाल होईपावेतो सामनेवाला क्र. १ याने अर्जदारास दरमहा रु. २५००/– प्रमाणे अंतरिम पोटगी दिल्यास त्यातून तिचे व्यवस्थित पालनपोषण होऊ शकेल. तसेच, सामनेवाला क्र.

१ वर सुध्दा अधिकचा भार पडणार नाही. सबब, विचारार्थ बाब क्र. १ चा निष्कर्ष मी होकारार्थी नोंदवून अर्जदार हिस दरमहा रक्कम रु. २५००/– प्रमाणे अंतरिम पोटगी मंजूर केल्याचा निष्कर्ष नोंदवित आहे. सबब, विचारार्थ बाब क्र. २ च्या अनुषंगाने मी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे,

**आ दे श**

१. अर्ज अंशतः मंजूर करण्यात आला.

२. सामनेवाला क्र. १ यास आदेशित करण्यात येते की, त्याने मूळ अर्ज दाखल तारखेपासून ते मूळ अर्ज निकाली होईपर्यंत अर्जदारास दरमहा रक्कम रु. २५००/– (रक्कम रुपये दोन हजार पाचशे फक्त) प्रमाणे अंतरिम पोटगी द्यावी.

३. या आदेशाची प्रत अर्जदार व सामनेवाला यांना तसेच संबंधीत पोलीस ठाण्याचे अधिकारी यांना मोफत देण्यात यावी.

४. खर्चाबाबत तुर्तास कुठलाही आदेश नाही.

SACHIN SAMBHAJI SALUNKHE Digitally signed by SACHIN SAMBHAJI SALUNKHE Date: 2026.04.09 17:24:15 +0530

(**एस. एस. साळुंखे**)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र. ३, सांगोला.

दिनांक – ०९/०४/२०२६.

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी खात्री देतो की, सदर आदेशाच्या / न्यायनिर्णयाच्या पीडीएफ फाईलमधील मजकूर हा मूळ आदेश / न्यायनिर्णयाप्रमाणेच शब्दशः आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : | वि. अ. डांगे |
| न्यायालय | : | न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, सांगोला. |
| आदेश / न्यायनिर्णयाचा दिनांक | : | ०९/०४/२०२६ |
| पिठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केलेली दिनांक | : | ०९/०४/२०२६ |
| निकाल अपलोड केलेले दिनांक | : | ०९/०४/२०२६ |